# — थेंबे थेंबे साचते तळे —

## [अल्प बचतीचा पोवाडा]

ले. :- शाहीर विनायक प्र. जामखेडकर
सहाय्यक संचालक, अल्पबचत, जळगांव

थेंबे थेंबे साचते तळे। तत्त्व आगळे।
जाणती सगळे। बचतीचे पिकवा हिरवेगार मळे।
नवीन नारवा सुखाची फळे। 'विनायक' सांगतो
गुपित सगळे ॥ धृ ॥

चाल :- एके दिवशी शोभाताई म्हणे प्रभाताईला।
पोर हुशार, पुढं शिकवावं कसं त्याजला।
पैसा कुठून आणावा, लग्नकार्य करण्याला।
ही चिंता जाळी जीवाला। जीवाला, तुम्हा आम्हाला।
उपाय काय त्याला, प्रश्न समद्याला ॥
प्रभाताई म्हणे सोडाव तुम्ही चिंतेला।
आमच्या ह्यांनी तोडगा (यावर) चांगला शोधुन काढला।
चिंता नको भविष्याची, सांगते ऐकाव जरा।
पै-पैका जमवावा जरा। जरा-जरा, जमतो हा बरा।
येतो कामाला, उपाय हा खरा ॥
चाल :- बचतीचे तत्त्व लई भारी। निसर्गही तेच आचरी ॥
किडे मुंग्या जाणती सारी। भविष्याची बेगमी न्यारी ॥
राखुन ठेवता दाणे मूठभरी। बघता बघता पोतही भरी ॥
अडि-अडचण उभी सामोरी। बचतीची शिदोरी भारी ॥
चाल :- धडधाकट शरीर असताना। सवय लावा बचतीची आता।
उधळपट्टी थांबवून आता। काटकसर करण्याला शिका।
चहाबाज मित्रांनो ऐका। सिगारेट शौकिनांनो ऐका।
दररोज एक कप कमी चहा तुम्ही प्यावा ॥

दररोज एक कप चहा कमी तुम्ही प्यावा ॥
दिवसाकाठी एक सिगारेट कमी तुम्ही प्यावा ॥
विडी काडीसंगे पैश्यांचा धूर थांबवावा ॥
सुपारीच्या खांडासंगे का हो पैसा चघळता ॥
पैसा मिळता बाजार हटाला ।
पै-पैसा त्यातून ओगळावा ।
मोहाला आवर घालावा ।
पगाराचा दिवस ठरवावा ।
हप्ता बिनचूक भरवावा ।
महिन्याकाठी पाच रुपयाचा खात्यामधी भरणा ॥
सहज शक्य बचत सर्वांना, नाना योजना ॥
चाल:- अल्पबचतीच्या नाना योजना, तुमच्यासाठी तैयार ।
गरीब, मध्यम श्रीमंत सारे, लाभ सारखे घेणार ॥
पाच रुपयाची नोट देऊनी, पोष्टात खाते खोलणार ।
पाच टक्क्यांच व्याज तुम्हाला, कोणती बँक ती देणार ॥
दोनशे रूपये जमा खात्यावर, जणू लॉटरी फुटणार ।
दर सहा महिन्यांनीच सोडत, पान बक्षिसास होणार ॥
पाच वर्षांचे विकास रोखे, राष्ट्र विकासा हातभार ।
तेरा टक्क्यांच व्याज घसघशीत, दुजा कोण हो देणार ॥
राष्ट्र सेवेची नामी संधी, फुका कोण ती सोडणार ।
गंगा दारी आली असता, कर/हात नाही का धुणार ॥
धंदा स्वतःचा लाख मोलाचा, फंड तुम्हासही मिळणार ।
भविष्य निर्वाह निधी तयास्तव, वार्धक्याचा आधार ॥
नव्या-नव्या बचतीच्या योजना, किती तुम्हा मी सांगणार ।
पोष्टांमधी वा एजंटाकडे, माहिती सविस्तर मिळणार ॥
महिला प्रधान क्षेत्रीय योजना, 'खास भगिनींना हा वर' ।
फुरसत लावा योग्य कारणी, धनप्राप्तीही होणार ॥
चाल:- अशी बचत करता खरोखरी । पोर शिकली-सवरली सारी ।
भाग्यवंत निघाली खरी । छानदार मिळे नौकरी ।

—पुढे पहा—

शोभानाईच्या पोरी सासरी | गळ्यामधे सुखाच्या सरी |
सुखशांती समाधान घरी | संसाराची गोड भाकरी |
बचतीच्या मंत्रानं इच्छा सर्वांची पुरी ||

चाल:- हा स्वार्थ तुम्ही साधावा | अशी अल्प बचत योजना ||
परमार्थ तुम्ही साधावा | ही अल्प बचत योजना ||
देशसेवा तुम्ही साधाना | ही अल्पबचत योजना ||
बहुगुणी फायदे नाना | ही अल्पबचत योजना ||
लाभाचं पीक पेराना | ही अल्पबचत योजना ||

[मिळवणी :-]

आचरा मंत्र बचतीचा | अर्थप्राप्तीचा | देशसेवेचा |
स्वार्थ-परमार्थ दोन्ही साधणार | संसार नौका
पैलतीरी लागणार | विघ्नहर्ता 'विनायक' तारणार || १ ||

संपूर्ण

स्थळ : जळगांव
दि. २८.१०.१९७८

विनायक प्रल्हादराय
जामखेडकर
जळगांव